शिधापत्रिकाचे नुतनीकरण, विभक्तीकरण व जीर्ण शिधापत्रिका बदलून देण्याबाबतची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक - विकाक-२०१८/प्र.क्र.११(भाग-२)/नापु-२८
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- २० जुलै, २०१९

वाचा:-

१) शासन निर्णय क्र.साविव्य-१०९९/प्र.क्र.८८८६/नापु-२८, दि.५ नोव्हेंबर, १९९९

२) शासन परिपत्रक क्र.साविव्य-१०९९/३०१९/प्र.क्र.८८४६/नापु-२८, दि.२५ फेब्रुवारी,२०००

३) शासन निर्णय क्र.शिवाप-२०१३/प्र.क्र.१०५/नापु-२८, दि.२९ जून, २०१३

शासन परिपत्रक :-

राज्यात दिनांक १ जून, १९९७ पासून लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरू करण्यात आली असून, त्यानुसार तीन रंगांच्या शिधापत्रिका नागरिकांना देण्यात येतात. यासंबंधात नागरिकांना द्यावयाच्या नवीन शिधापत्रिकांसाठी निकष व कार्यपध्दती संदर्भिय क्र.१ व २ येथील अनुक्रमे दि.५ नोव्हेंबर, १९९९ च्या शासन निर्णय व दि.२५ फेब्रुवारी, २००० च्या परिपत्रकान्वये ठरवून देण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण) आदेश, २०१५ मध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या अंमलबजावणीसाठी सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. सदर कार्यपध्दतीची योग्य अंमजबजावणी करणे राज्य शासनास बंधनकारक आहे. शिधापत्रिका वितरणाबाबत शासन स्तरावर नागरिकांची सनदही प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सेवाहक्क मध्येही याबाबीचा समावेश करण्यात आला आहे.

२. महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या विविध मागण्यांपैकी एक मागणी शिधापत्रिकेचे नुतनीकरण, विभक्तीकरण आणि गरजूंना नवीन शिधापत्रिका बदलून देणे अशी आहे. या मागणीच्या अनुषंगाने शिधापत्रिकासंदर्भात प्रत्येक महिन्याचा आढावा घेऊन एकत्रित माहिती उपआयुक्त (पुरवठा) यांनी प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेस शासनास विहित विवरणपत्रात सादर करण्याबाबतच्या सूचना दि.२५.०५.२०१८ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत. तथापि, कोणत्याही जिल्हयाची माहिती राज्य शासनास सादर करण्यात येत नसल्यामुळे या संदर्भात शासन स्तरावर आढावा घेणे शक्य होत नाही.

३. महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या मागण्यासंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि.१७.०२.२०१९ रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीमध्ये नाशिक जिल्हयामध्ये रेशनकार्डच्या विभक्तीकरणाची प्रकरणे मोठया प्रमाणावर प्रलंबित असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

४. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ च्या तरतुदीनुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिनस्त कार्यालयांमार्फत पात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा दि.१४.१०.२०१५ च्या अधिसूचनेन्वये अधिसूचीत करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये नवीन शिधापत्रिका देणे, दुय्यम शिधापत्रिका (खराब, फाटलेली, जीर्ण) देणे, शिधापत्रिकेतील नाव कमी करणे इ. बाबींचा समावेश असून, त्यासाठी कालमर्यादा विहित करण्यात आलेली आहे, असे

असतानांही अशी प्रकरणे मोठया प्रमाणावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे. ही बाब विचारात घेता जीर्ण शिधापत्रिका बदलून देणे, संयुक्त शिधापत्रिकांचे विभक्तीकरण करणे व नवीन शिधापत्रिका देणेबाबतच्या प्रकरणांचा नियमित आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत, तसेच नवीन शिधापत्रिका देण्याबाबत व विभक्त कुटुंबांसाठी दुय्यम शिधापत्रिका वितरीत करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी व यासंदर्भातील कार्यवाही दिनांक ३१.०८.२०१९ पर्यंत पुर्ण करून त्याबाबतचा अहवाल शासनास तात्काळ सादर करावा, अशा सूचना याद्वारे देण्यात येत आहेत. सर्व संबंधीत क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०१९०७२०१५५९०२३६०६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Charushila Chandrakant Tambekar

Digitally signed by Charushila Chandrakant Tambekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies and Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=332dfd6e6db0a06570cca25f9c39add2bebc7d207b3405d11e474330d0a9e014, serialNumber=2b0496c0c213a3f50c6522cc39ae5de95e1150ac3287e89c21b1422e313820a2, cn=Charushila Chandrakant Tambekar
Date: 2019.07.20 16:03:57 +05'30'

(चारूशीला तांबेकर)
शासनाच्या सह सचिव

प्रति,

१. सर्व जिल्हाधिकारी
२. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
३. सर्व उप आयुक्त (पुरवठा)
४. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
५. सर्व अन्नधान्य पुरवठा अधिकारी
६. पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई
७. संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
९. खाजगी सचिव, मा.मंत्री, (अ.ना.पु. व ग्रा.सं.), मंत्रालय, मुंबई
१०. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री, (अ.ना.पु. व ग्रा.सं.), मंत्रालय, मुंबई
११. खाजगी सचिव, मा.अध्यक्ष, ग्राहक कल्याण उच्चाधिकार समिती,
१२. सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय
१३. निवड नस्ती, नापु-२८